गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ● अंक १०९ वा ● गुरुवार ०५ सप्टेंबर २०२४ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-
| * Volume 2 | Issue 109 | Date : 05/08/2024 | blow Thursday | Page 4 Price 4

# एसटी कर्मचाऱ्यांचा संप अखेर मागे

## जाऊ दे रे गाडी...आजपासूनच गाड्या सुरू होणार; संपाबाबत मंत्री उदय सामंतांनी दिली अपडेट

**दैनिक यशसिद्धी न्युज**



मुंबई : राज्यातील एसटी कर्मचारी संपाच्या पार्श्र्वभूमीवर सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्र्यांसोबत संघटनांची बैठक झाली. एसटी कर्मचारी कृती समिती संघटनेने बेमुदत संपाची हाक दिली होती, आज संपाचा दुसरा दिवस असून राज्यात प्रवाशांची मोठी गैरसोय झाल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा महाराष्ट्र दौरा असतानाच हा संप पुकारण्यात आल्याने प्रशासनाची मोठी धांदल उडाली होती. त्यातच, आज मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचारी संघटनांनी आपला संप मागे घेतला आहे. त्यामुळे,आजपासूनच गाड्या सुरू होणार असल्याचं मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं. एसटी कर्मचाऱ्यांना पगारात साडे सहा हजारांची घसघशीत वाढ करण्यात आली. त्यामुळे, मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीनंतर एसटी कर्मचाऱ्यांनी संप मागे घेत आनंद व्यक्त केला, कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींनी सह्याद्री गेस्ट हाऊस बाहेर जल्लोष केला आहे.

सह्याद्रीवरील बैठकीनंतर मंत्री उदय सामंत बोलताना म्हणाले की, मी सर्वप्रथम मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानतो. सरसकट मूळ वेतनात साडेसहा हजार रुपये वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एसटी कर्मचारी वेतन आणि महिलांच्या स्वच्छतागृहाचाही प्रश्न होता. एमआयडीसीच्या माध्यमातून ७०० कोटी खर्च करुन, कंत्राटीकरणातून कामाला सुरुवात झाली आहे. या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले होते, मुख्यमंत्री महोदयांनी ६.५ हजार रुपये पगारवाढीची मागणी मान्य केली आहे. माझी आपल्या सर्वांच्या माध्यमातून विनंती आहे, तातडीने हा संप कर्मचारी संघटना मागे घेतील. आजपासूनच गाड्या सुरू होतील, गणेशोत्सवाचा सण आहे, कोकणात जाणाऱ्यांसाठी महत्वाचं आहे. त्यामुळे, आजपासूनच गाड्या सुरू होतील, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे आम्ही आभार मानतो.ज्या मागण्या मान्य करण्यासाठी आम्ही गेलो होतो, ते सढळहस्ते पहिल्यांदाच एसटी कर्मचाऱ्यांना मिळालं आहे. साडे सहा हजार रुपये पगारवाढ देण्याचा निर्णय झाला आहे. तसेच, गेल्या ६ महिन्यांपासून २००० कर्मचारी घरी बसले आहेत. लहान-सहान केसेससाठी घरी असलेल्या कर्मचाऱ्यांना कामावर घेण्याचाही निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला आहे. मला वाटतं हा आनंद जनतेसोबत कर्मचाऱ्यांनाही मोठा आहे. महाराष्ट्रात ही पहिली वेळ आहे, २३ संघटनांच्या कर्मचाऱ्यांची आज बैठक झाली. पुन्हा एकदा संघटनेतर्फे आम्ही राज्य सरकारचे आभार मानतो, असे संघटनेच्या पदाधिकारी यांनी म्हटलं आहे.

दरम्यान, आज दिवसभरात ११ कामगार संघटनांच्या कृती समितीने पुकारलेल्या आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर राज्यभरातील एसटीच्या २५१ पैकी ९४ आगार पुर्णतः बंद होते. ९२ आगारांमध्ये अंशतः वाहतूक सुरू होती. तर ६५ आगारामध्ये पुर्णतः वाहतूक सुरळीत सुरू होती. आज ४०,०६९ नियोजित फेऱ्यांपैकी आंदोलनामुळे २७४७० फेऱ्या रद्द झाल्या आहेत. दिवसभर सुमारे ७०% वाहतूक बंद होती. त्यामुळे, आज दिवसभर सुमारे २२ कोटी रुपयांचा महसूल बुडाला असल्याची माहिती आहे.

## पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत अपात्र ठरलेल्या आमदारांना पेन्शन न देण्याचे विधेयक हिमाचल प्रदेशात मंजूर

नवी दिल्ली : हिमाचलमधील सुखविंदर सिंह यांच्या सरकारने आज मोठा निर्णय घेत, हिमाचल प्रदेश विधानसभा (सदस्यांचे भत्ते आणि निवृत्ती वेतन) दुरुस्ती विधेयक मंजूर केलं आहे. हे विधेयक मंगळवारी विधानसभेत सादर करण्यात आले होते. आज या विधेयकावर चर्चा झाल्यानंतर हे विधेयक मंजूर करण्यात आले. या विधेयकानुसार पक्षांतरबंदी कायद्यांतर्गत अपात्र ठरलेल्या आमदारांना पेन्शन न देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. हे विधेयक लागू झाल्यानंतर राजकीय लाभासाठी पक्षांतर करणाऱ्यांना आमदारांवर वचक बसेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. हिमाचल सरकारने पारित केलेल्या या विधेयकाला भारतीय जनता पक्षाकडून मात्र विरोध करण्यात आला आहे.

## राज्य सरकारचा मोठा निर्णय;
# नागपुरात उभारणार मिनी बॉलिवूड; १०० हेक्टरमध्ये भव्य चित्रनगरी

**दैनिक यशसिद्धी न्युज**

मुंबई : मराठी चित्रपटांचा दर्जा वाढावा, सिनेमागृहांमध्ये मराठी चित्रपट प्रेक्षकांची गर्दी व्हावी तसेच निर्माता, दिग्दर्शक, अभिनेते यांचे मनोबल उंचवावे हेच सांस्कृतिक कार्य विभागाचे धोरण असून या सर्व बाबींना प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्या पाठीशी मी खंबीरपणे उभा आहे, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्य मंत्री ना. सुधीर मुंनगटीवार यांनी आज मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत दिली. तसेच, मराठी चित्रपट विश्र्वाकरिता अनेक महत्वाचे निर्णय घेतले. त्यामध्ये प्रामुख्याने नागपूर येथे १०० हेक्टर मध्ये भव्य चित्रनगरी उभारण्यासह अर्थसहाय्य योजनेतून निर्मात्यांना बळ देण्याच्या सूचना देखील त्यांनी दिल्या. त्यामुळे, आता नागपुरात मिनी बॉलिवूड उभारत असल्याचं म्हणता येईल. या माध्यमातून मराठी चित्रपटसृष्टीला अधिकचं बळ मिळणार आहे.

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य योजनेच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत अर्थसहाय्या करिता दर्जा देताना अ आणि ब दर्जासह क' दर्जाचा समावेश करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपटांना दुप्पट अनुदान देण्याचा आणि पुरस्कार प्राप्त महिला दिग्दर्शिकेला प्रोत्साहनपर ५ लक्ष रुपये देण्याचा महत्वपूर्ण निर्णय या बैठकीत घेण्यात आले. या घोषणाचा तात्काळ शासननिर्णय निर्गमित करण्याच्या सूचना संबधित अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी सांस्कृतिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसेपाटील, उप सचिव महेश वाव्हळ, बाळासाहेब सावंत, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी सांस्कृतिक विकास महामंडळाच्या सह व्यवस्थापकीय संचालक मीनल जोगळेकर, कक्ष अधिकारी अनिरुद्ध देशपांडे आदि अधिकाऱ्यासह प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया बेर्डे, निर्माते संदीप घुगे, बाबासाहेब पाटील, गार्गी फुले, अशोक राणे,हेनल मेहता, जयेश जोशी, अरुण दळवी, देवेंद्र मोरे, बाळासाहेब गोरे, चंद्रकांत विसपुते, शिरीष राणे, प्रशांत मानकर आदी चित्रकर्मी उपस्थित होते. या बैठकीत मुंनगंटीवार यांनी मराठी चित्रपट धोरण लवकरच तयार करण्यात येणार असून त्याबाबतची समिती गठीत करण्याबाबतच्या सुचनाही अधिकाऱ्यांना दिल्या. आपल्या राज्याला चित्रपटाचा समृद्ध वारसा लाभला आहे. आपल्या मराठी चित्रपटांचा हा वारसा जतन करण्यासाठी आगामी काळात भव्य असे मराठी चित्रपट संग्रहालय उभारणार असल्याचे मुनगंटीवार यांनी सागितले. त्यासाठी समिती स्थापन करण्याच्या सुचना सांस्कृतिक विभागाला दिल्या आहेत.

## शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या कर्ज योजनांसाठी अर्ज करा

**दैनिक यशसिद्धी न्युज**

सोलापूर/प्रतिनिधीः शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत एन.एस.टी.एफ.डी.सी.नवी दिल्लीच्या धर्तीवर शासनामार्फत स्वयंरोजगाराच्या कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. जुन्नर येथील शबरी शाखा कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणारे पुणे, अहमदनगर,

सातारा, सांगली, सोलापुर, कोल्हापुर, उस्मानाबाद, बीड, लातुर या जिल्ह्यातील आदिवासी लाभार्थ्यांसाठी कर्ज योजना राबविण्यात येत आहे. या जिल्ह्यातील आदिवासी समाजातील इच्छुक उमेदवारांनी www.mahashabari.in या संकेतस्थळाच्या माध्यमातुन दि. १५ सप्टेंबर २०२४ पर्यंत ऑनलाईन कर्ज फॉर्म भरावेत, असे आवाहन जुन्नर शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाचे शाखा व्यवस्थापक रा.भ. पाटील यांनी केले आहे.जुन्नर शाखा कार्यालयास सन २०२४-२५ साठी महिला सबलीकरण योजना (रु. २ लक्ष)-२२, कृषी आणि संलग्न व्यवसाय (रु. ५लक्ष)-६, हॉटेल ढाबा व्यवसाय (रु.५ लक्ष)- ६, ऑटो वर्क शॉप/ स्पेअर पार्ट (रु. ५लक्ष) -६, वाहन व्यवसाय (रु.१० लक्ष पेक्षा जास्त व रु. १५ लक्ष पर्यंत)- ८ याप्रमाणे योजनानिहाय लक्षांक प्राप्त झाला आहे.यासाठी कोणत्याही प्रकारे ऑफलाईन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उदगीर येथील 'विश्वशांती बुद्ध विहार'चे लोकार्पण



**दैनिक यशसिद्धी न्युज**

लातूर : उदगीर (जि.लातूर)येथील तळवेस परिसरातील नवनिर्मित विश्र्वशांती बुद्ध विहाराचे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज लोकार्पण झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री गिरीष महाजन, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, सर्वश्री आमदार विक्रम काळे, रमेश कराड, अभिमन्यू पवार, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे उपस्थित होते.राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या **। पान २ वर**

# अनिल सावंत मित्रमंडळा कडून गणेश उत्सवानिमित्त विविध उपक्रम

## गणेश उत्सवानिमित्त २००० कुटुंबांना मोफत गणेश मूर्ती भेट, व ५० हजार अर्थी संग्रहाचे मोफत वाटप,..

**दैनिक यशसिद्धी न्युज**




पंढरपूर/प्रतिनिधी :मंगळवेढा तालुक्यातील लवंगी येथील भैरवनाथ शुगर च्या माध्यमातून मंगळा तालुक्यात मोठा जलसंपर्क असलेल्या कारखान्याचे व्हाईस चेअरमन अनिल सावंत यांचा पंढरपूर शहर व तालुक्या वरती मोठा जलसंपर्क असल्याने तसेच पंढरपूर शहर व तालुक्यातील विविध विधायक उपक्रमात देखील त्यांचा मोठा हात हातखंड असल्यामुळे पंढरपुरात ते वास्तवास असल्याने या भागातील प्रश्र्नांची जाण असलेले नेतृत्व अशी ओळख निर्माण करण्यात ते यशस्वी झाले आहे आता आगामी गौरी गणपती सना निमित्त अनिल दादा सावंत मित्रमंडळाकडून विधायक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून पंढरपूर शहरात विविध भागात गणेशोत्सवानिमित्त २००० कुटुंबांना मोफत गणेश मूर्ती भेट देण्यात येणार आहे, तर ५० हजार आरती संग्रह तसेच २०० फलक ही वितरित करण्यात येणार आहे. व्हाईट चेअरमन अनिल दादा सावंत यांनी आतापर्यंत राबवलेले विधायक उपक्रम व **। पान २ वर**

# 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'ने घेतली पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराची नोंद


## आरोग्य मंत्री प्रा.डॉ.तानाजी सावंत वारकऱ्यांसाठी ठरले 'आरोग्य दूत'



**दैनिक यशसिद्धी न्युज**

पुणे/प्रतिनिधीः आरोग्याची वारी पंढरीच्या दारी - वर्ष २ रे पंढरपूरच्या आषाढी वारीत या वर्षी १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची रुग्णसेवा यशस्वीरित्या पार पाडत, आरोग्य विभागाने आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या पुढाकाराने वारकऱ्यांसाठी केलेल्या सेवेसाठी एक नवा इतिहास रचला आहे. पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डस'ने घेतली असून, हा विक्रम महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे. १५ लाखांहून अधिक वारकऱ्यांच्या तपासणीची जबाबदारी पार पाडताना आरोग्य विभाग व डॉ. तानाजीराव सावंत हे खऱ्या अर्थाने वारकऱ्यांसाठी आरोग्यदूत ठरले आहेत.

प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या संकल्पनेतून सुरु झालेल्या


CERTIFICATE

INTERNATIONAL WORLD RECORDS OF EXCELLENCE BOOK OF RECORDS

RECORD HOLDER
DR. TANAJIRAO SAWANT
(HEALTH & FAMILY WELFARE MINISTER, GOVT. OF MAHARASHTRA)

THE WORLD RECORD OF "LARGEST MEDICAL CAMP ORGANISED" WAS ACHIEVED BY DR. TANAJIRAO SAWANT, MR. SHIVAJIRAO SAWANT, DR. DHARMENDRA KUMAR, DR. DILIP PAWAR & R. K. HIV AIDS RESEARCH & CARE CENTRE ON 18TH JULY 2024 FROM MUMBAI (MAHARASHTRA) INDIA. THEY ORGANIZED THE LARGEST MEDICAL CAMP IN PANDHARPUR, MAHARASHTRA, IN WHICH 15,12,774 PEOPLE PARTICIPATED, GOT THEIR MEDICAL CHECK-UPS DONE BY 7500 DOCTORS AND PARAMEDICS

SALUTE THE TALENT

WWW.INTERNATIONALBOOKOFRECORDS.COM

'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमामुळे पंढरपूरच्या वारीला एक नवी ओळख मिळाली आहे. त्यांचे कार्य नक्कीच कौतुकास्पद आहे, ज्यामुळे अनेक वारकऱ्यांचे जीव वाचले आणि लाखो वारकऱ्यांना तात्काळ उपचार मिळाले. वारी दरम्यान आणि पंढरपूर येथे महाआरोग्य शिबिरात वेळेवर आणि सहज, दर्जेदार उपचार मिळाल्यामुळे वारकऱ्यांनी आरोग्य मंत्री प्रा. डॉ. सावंत यांचे मनापासून आभार मानले आहेत.

पंढरपुरातील महाआरोग्य शिबीर ठरले जगातील सर्वात मोठे आरोग्य शिबीर

जगातील सर्वात मोठ्या आरोग्य शिबिराचे आयोजन केल्याबद्दलची नोंद 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डस'ने केली आहे. या महाआरोग्य शिबिरात १५,१२,७७४ लोकांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली आणि त्यासाठी ७,५०० डॉक्टर आणि पॅरामेडिक कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

पालखी मार्ग आणि पंढरपुरातील महाआरोग्य शिबिरात १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना आरोग्य सेवा

आषाढी एकादशीनिमित्त देहू-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यातून या दरम्यान निघालेल्या पालखी **। पान २ वर**

## सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पालखी मार्ग आणि पंढरपूर येथे पुरविण्यात येणाऱ्या सेवेची वैशिष्ट्ये –

* पालखी सोहळा २०२४ साठी एकूण मनुष्यबळ - ६,३६८ * प्रत्येक ५ किमी अंतरावर 'आपला दवाखाना' - २५८ * वारी दरम्यान १०२ व १०८ रुग्णवाहिका २४* ७ उपलब्ध - ७०७ * दिंडी प्रमुखांसाठी औषधी कीट - ५,८८५ महिला वारकऱ्यांसाठी स्त्री रोग तज्ज्ञ - १३६ *पालखी मुक्कामाच्या ठिकाणी हिरकणी कक्षाची स्थापना - १३६ *पालखी मार्गावर आरोग्य दूत - २१२ *पालखी सोबत माहिती, शिक्षण व संदेशवहन चित्ररथ - ९ * पालखी मुक्कामाच्या ठिकाणी ५ बेडची क्षमता असलेले अतिदक्षता कक्ष - ८७ *आरोग्य शिक्षण संवाद आरोग्य ज्ञानेश्र्वरी उपक्रम.* विविध माध्यमाद्वारे आरोग्य जनजागृती.* पालखी मार्गावरील सर्व हॉटेल्स व त्या अंतर्गत असलेल्या कामगारांची आरोग्य तपासणी तसेच पाणी नमुने तपासणी.* पालखीच्या मुक्कामाच्या ठिकाणच्या किचनची तपासणी.* १८६ टँकरद्वारे शुध्द पाणीपुरवठा तपासणी, पालखी मार्ग व मुक्कामाच्या ठिकाणी धूर फवारणी, पाण्याच्या सर्व स्रोतांचे ओटी टेस्ट तसेच आरोग्य संस्थांमार्फत जैवकचरा विल्हेवाट. * पालखी मार्गावर आरोग्यविषयक जनजागृतीसाठी समाज माध्यमात, डिजिटल, प्रिंट, होर्डिंग्ज तसेच ९ चित्ररथार्फत जनजागृती व प्रचार.* १०८ रुग्णवाहिकेमार्फत अत्यावश्यक सेवा.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

बुधवार दि.०४ सप्टेंबर २०२४



## संपादकीय

### ही बाब संतापजनकच..

छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५ फूट उंचीचा पुतळा मालवणच्या राजकोट किल्ल्यावर अवघ्या आठ महिन्यांपूर्वी उभारण्यात आला खरा, मात्र राज्य सरकारच्या किडलेल्या व्यवस्थेने महाराष्ट्राच्या या अस्मितेलाच धारातीर्थ केले. मुघल साम्राज्याचा अत्यंत शक्तिशाली आणि क्रूर सम्राट म्हणून ज्याची ओळख होती, त्या औरंगजेबाचे खच्चीकरण करणारे, विजापूरच्या आदिलशाही राज्याचा बलाढ्य सेनापती म्हणून लौकिक असलेल्या अफजलखानाचा वाघनखांनी खात्मा करणारे, अफजलखानाच्या वधानंतर विजापूर आणि कुतुबशाही या दोन प्रबळ शत्रूंना पराभूत करून आपले साम्राज्य विस्तारणारे, मुघल साम्राज्याचा शक्तिशाली सेनापती असलेल्या शाहिस्तेखानाची बोटे छाटणारे आणि सिद्दी जोहरच्या बलाढ्य सैन्यदलाचा वेढा धुडकावत पन्हाळगडावर सहिसलामत पोहचणारे छत्रपती शिवाजी महाराज य ांना महाराष्ट्रातच काय संपूर्ण भारतात कुणी धक्का लावू शकले नाही. पण त्यांची प्रतिकृती सावरणे राज्य सरकारला जमले नाही. आपले अपयश झाकण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ४५ किलोमीटर प्रती तास वेगाने वाहणाऱ्या वाऱ्यावर खापर फोडले. पुतळा का पडला याची कारणमीमांसा फॉरेन्सिक इव्हेस्टीगेशननंतर त्यांनी केली असती तर बरे झाले असते. परंतु, प्रत्येक गोष्टीचे राजकारण करण्यात पटाईत असलेले सत्ताधारी आता निसर्गालाही सोडत नसल्याचे मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्यावरुन अधोरेखित होते. मुळात मालवणला ४५ किलोमीटर वेगाने वारे आताच वाहू लागले का? याचेही स्पष्टीकरण मुख्यमंत्र्यांनी द्यावे. केवळ निवडणुकांपुरताच छत्रपती शिवाजी महाराजांचा वापर करणारी राजकारणी मंडळी महाराजांच्या व्यवस्थापनाचा अभ्यास कधी करणार, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो. खरे तर राजकोट किल्ला हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन कौशल्याची साक्ष देणारा किल्ला आहे. स्वराज्य स्थापनेतील एक महत्त्वाचा किल्ला म्हणून याचा लौकिक होता. या किल्ल्याची बांधणी १६६० च्या सुमारास शिवाजी महाराजांनी केली. हा किल्ला मालवणच्या किनारपट्टीवरील समुद्राच्या जवळ बांधण्यात आला होता. किल्ल्याचे स्थान महत्त्वपूर्ण होते. कारण ते अरबी समुद्राच्या किनारी वसलेले होते. ज्यामुळे तो व्यापाराच्या मार्गांवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम होता. ज्यांच्यासमोर भल्याभल्यांनी गुडघे टेकवले, ज्यांना कुणीही हलवू शकले नाही त्या बलशाली, शिवरायांच्या पुतळ्याला जमीन दाखवण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले, ही बाब संतापजनकच म्हणावी लागेल.

# ५ सप्टेंबर म्हणजे शिक्षकांचा सन्मानाचा दिवस : प्रा.काशिनाथ आटपाडकर

**दैनिक यशसिद्धी न्युज**

प्रथम शिक्षक दिनाच्या सर्व गुरुजनाना हार्दिक शुभेच्छा

डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा५सप्टेंबर १८८८रोजी जन्म झाला . भारतीय संस्कृती व भारतीय तत्व चिंतकाचा जगाला परिचय करून देणारा तत्त्वचिंतक म्हणजे डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन होय आपण त्याची आठवण म्हणून ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करतो व त्या दिवशी आपल्या सर्व गुरुजनांचा आदर्श सन्मान करतो भारतीय तत्वज्ञानातील ओळख हि जगाला करून दिली त्यांनी परदेशात जाऊन शिक्षण घेण्यापेक्षा परदेशी लोकांनाच आपले तत्त्वज्ञान पटवुन दिले धार्मिक ओढीमुळे तत्वज्ञानाला जवळ केले संपूर्ण भारत देश त्यांच्याकडे आपुलकीने पाहू लागलां त्यांनी विज्ञान युगतील आदर्श शिक्षक म्हणून काम केले त्यांचा भारतीय विद्यापीठ उभारणीमध्ये मोलाचं वाटा होता भारतीय मंत्रिमंडळ मध्ये परराष्ट्र मंत्री,उपराष्ट्रपती राष्ट्रपती सुद्धा समर्थपणे भूषविले या महापुरुषाने आदर्श शिक्षक म्हणून कायम भूमिका बजावली त्यांना भारतरत्न हा किताब देऊन भारत सरकारने गौरविण्यात आले या तत्त्वचिंतक शिक्षकाच्या स्मुतीसाठी शिक्षक दिन साजरा केला जातो . आज आपण प्रत्येक शाळेमध्ये शिक्षक दिन मोठ्या उत्साहात आणि आनंदात

साजरा केला जातो . शिक्षकाने आपणाला एका वेगळ्या वळणावर आणून मार्ग दाखविला म्हणून समाजाने आपल्या गुरुजनांचा आणि शिक्षकांचा आवृजुन मान सन्मान करण्यात यावा. शिक्षकांसाठी आज आनंदाचा आणि सन्मानाचा वेगळा दिवस आहे

गुरु शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीमधील एक महत्त्वपूर्ण आणि पवित्र भाग आहे जीवनात आई-वडिलांची जागा कोणीही भरू शकत नाही कारण आम्हाला या सुंदर जगात आणण्याचा श्रेय असल्याने जीवनातील सर्वात पहिले गुरू आमचे आई-वडील आहेत असतात भारतात प्राचीन काळापासून गुरु शिष्य परंपरा असून शिक्षक हे आम्हाला जगण्याचा योग्य मार्ग दाखवतात योग्य दिशेकडे वाटचाल करण्यासाठी प्रेरित करतात व त्यासाठी प्रोत्साहन देतात. शिक्षकाच्या हातात देशाच्या भवितव्य अवलंबून असते कारण शिक्षकांमुळे भविष्यातील डॉक्टर ,इंजिनियर ,लेखक शास्त्रज्ञ, शिक्षक ,व अनेक क्षेत्रात प्रगती करणारी पिढी निर्माण होत असते आणि अनेक क्षेत्रांमध्ये प्रगती करून देशाचे नाव उंचावणारे सामर्थ्यवान पिढी तयार होत असते. आई-वडिलांनंतर शिक्षकाकडून बऱ्याच नवनवीन गोष्टी शिकायला मिळतात अथवा मार्गदर्शक म्हणून शिक्षकांना महत्त्वाचे स्थान आहे म्हणूनच शिक्षकांना दुसरे पालक पालकही म्हटले जाते आपले विचार मत आणि व्यक्तिमत्व घडवण्यामागे शिक्षकाचा



मोलाचा वाटा असतो. शिवाय चांगले संस्कार शिस्तीत राहणे योग्य शिक्षण देऊन जगासमोर उत्तम नागरिक म्हणून उभं करण्याची ताकद शिक्षकांमुळे येते या नात्याचा महत्त्व समजवण्यासाठी आणि शिक्षकाप्रती प्रेम व्यक्त करण्यासाठी ५ सप्टेंबर हा दिवस शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो भारताचे माझी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने शिक्षकाप्रती सन्मान प्रकट करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो गुरु याची प्रत्येकाच्या जीवनात महत्त्व असते समाजात त्यांचे एक विशिष्ट स्थान असतं. सर्वपल्ली राधाकृष्णन शिक्षणात विश्र्वास ठेवत असून ते एक महान व्यक्तिमत्व व विचारवंत आणि शिक्षक होते त्यांच्या शिक्षणाप्रती अत्यंत प्रेम होते या दिवशी संपूर्ण देशात भारत सरकारद्वारे आदर्श शिक्षकांना पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते या दिवशी अनेक शाळा आणि कॉलेजमध्ये विविध कार्यक्रम उत्सव साजरे केले जातात अनेक ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात विद्यार्थी वेगवेगळ्या पद्धतीने शिक्षकांची सन्मान करतात अनेक विद्यार्थी पुष्पगुच्छ भेटवस्तू देऊन त्यांचे आभार प्रदर्शन करतात .जीवनातील शिक्षक गुरूंना पुन्हा एकदा मांनाचा नमस्कार

# खिरापत

**विचार मंथन:-भूमिपुत्र वाघ ९१७२९७२४८२**

मित्रांनो खिरापत हा शीर्षक वाचल्यानंतर लगेच लक्षात येईल की,खिरापत म्हणजे लगाम सुटलेल्या घोड्यालाआवरता येत नाही आणि तो भरधाव वेगाणी कुठे जातो? का जातो? याला काहीच माहित नसतं. या अर्थाने खिरापतीकडे पाहिले जाते.

खिरापत द्यायलाच पाहिजे.परंतु ते देताना निरपेक्ष भावनेनी, सद्भावनानी,द्यायला पाहिजे.ते दान आहे.तो धर्म आहे. (धर्म म्हणजे जबाबदारी) त्यात दायित्वाची भावना असते. त्यास आपण दानधर्म असा शब्द प्रयोग करतो.आपण दानधर्म कोणाला करतो? जो विकलांग आहे.दुर्बल आहे.अपंग आहे.लहान आहे.अनाथ आहे.निराधार आहे.दुर्बल, प्राणी,पक्षी किंवा सर्वच सजीव असे म्हणू.अशांनाच आपण मदत करतो.जे लोक स्वतःच अन्न मिळवायला सक्षम नसतात.अशांना आपण मदत करतो.त्याला धर्म असे म्हणतात.त्याला दान असे म्हणतात.

ही रीत,ही परंपरा,हे उत्तरदायित्व सृष्टी निर्माण झाल्यापासून तयार झालेलं आहे.त्याची परंपरा ही मादी (आई) पासून तयार झालेली आहे.म्हणजे ही सृष्टी निर्माण झाल्यापासून प्रत्येक आई आपल्या लेकरांना सांभाळण्यासाठी ती उपाशी राहते.परंतु ती आपल्या लेकरा-बाळांना संभाळण्यासाठी पहिल्यांदा खाऊ घालते.दुर्बलास, लहान धाकटं याला जास्त खाऊ घालते.कारण ते दुर्बल असतं म्हणून.त्याची सुरुवात आई पासून होते. म्हणून जगात आईला सर्वश्रेष्ठ मानले जाते.ती निर्मिक असते.ती पोशिंदा असते ती दृष्टी देणारी असते.ती पालन कर्ता असते.ती ईश्र्वराच्या इतकीच श्रेष्ठ असते.ही रित,ही परंपरा,आईच्या कडून समाजाने स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे.आणि ते समाज स्वीकारत असतो.खऱ्या अर्थाने तेव्हापासून मदत आणि दानाची परंपरा सुरू झालेली आहे.पूर्वी मानव टोळ्या टोळ्यांनी राहत होता.तेव्हाही लहान लेकरं, म्हातारी माणसं यांना जंगलातून फळं,कंदमुळं आणून खाऊ घातली जायची.पुढे ते राजे जरवावाडे इथपर्यंत चालू राहिले.आपल्या भारताचा विचार करायचा झाल्यास. स्वातंत्र्याच्या पूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातला थोडासा इतिहास पाहिला तर तेव्हा आपत्ती, दुष्काळ, युद्ध अशा वेळी स्वरूपात जमा झालेले अन्नधान्य, सोनं-नाणं हे लोकांच्या हितासाठी वाटलं जायचं तशा नोंदी दिसून येतात.

भारत स्वतंत्र झाला त्यानंतर आपण आपल्या प्रति भारतीय संविधान स्वीकारलं.

घटना तयार करताना सुद्धा आपण रिझर्वेशन तयार केलं.ते सुद्धा दायित्वाच्या भावनेतून तयार केलं. सामाजिक,आर्थिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासांना सवलत देऊन,मदत करून त्यांना इतरांच्या बरोबरीने चालण्याची,जगण्याची क्षमता निर्माण करण्यासाठी रिझर्वेशन तयार करण्यात आलं. यालाच तर मानवी धर्म असे म्हणतात.आणि तो धर्म भारतीय संविधानाने आपल्याला शिकवला.जो धर्म म्हणून परंपरा चालत आली.त्यालाच आपण स्वीकारलं,पुरस्कृत केले.

आता खिरापत या विषयाकडे वळत असताना खिरापतीचा अर्थच असा आहे गरज असो, वा नसो. मस्ती आली.संपत्ती भरपूर मिळवली.प्रॉपर्टीची योग्य विल्हेवाट लावता येत नाही. त्यामध्ये गर्व,मस्ती या सर्व गोष्टी येतात.वाम मार्गाने मिळवलेलं धन,केलेली लूटमार ती उधळायची त्यातून खऱ्या अर्थाने खिरापत हा विषय पुढे येतो.खिरापत वाटत असताना.माणूस गरीब आहे गरजवंत आहे,का श्रीमंत आहे, की कसा.ते पाहिले जात नाही.समोर येणाऱ्यांना खिरापत वाटली जाते.

खऱ्या अर्थाने ही खिरापत गरीब,विकलांग,अनाथ अशासाठी नसते.तर ती समोर आलेल्यांसाठी असते.जवळच्या लोकांसाठी असते. परिवारातील लोकांसाठी असते. रस्त्यावरून अनोळखी लोकांसाठी सुद्धा असते.स्वार्थ आणि मोठेपणा मिळवायला असते.तिथे धर्म,न्याय, सहानुभूती ही मूल्य नसतातच यालाच खिरापत असे म्हटले जाते.

खिरापत वाटायला सद्भावना नसते.न्यायाची बाजू नसते.भविष्या काळातील विकासाचे स्वप्न नसते.अशावेळी खिरापत वाटली जाते. परवा आपण लाडकी बहीण ही योजना काढली. आता लाडके भाऊ, लाडक्या भाऊजाया, लाडके दीर,लाडकी मुलं, लाडके दाजी ह्या सर्व योजना खिरापती आहेत असे म्हटलं तर वावगे ठरणार नाही. हे सत्य आहे.

राष्ट्राचा,देशाचा,कारभारी कुणाला निवडतो,जो न्यायिक आहे,जो सर्वांसाठी समान पाहतो.आईच्या नजरेतून कारभार चालवतो. अशांच्याकडे कारभार दिला जातो.अशावेळी तो पात्रही असतो कदाचित. परंतु सत्ता हातात आल्यानंतर मात्र त्याची दृष्टी बदलते.आणि जेव्हा दृष्टी बदलते,तेव्हा तो कारभारी घराचं,एव्हाणा कुटुंबाचं,देशाचं वाटोळ करायला सुरुवात करतो. अशावेळी त्याला खिरापती सुचायला लागतात. मोठेपणा मिरवायला लागतो.आणि मग त्याच्या मनात कल्पना येते खिरापत वाटायची.

खरंतर कुटुंबातील, राज्यातील आणि देशातील विकलांग दुर्बल,मागास, अश्रयांच्या सर्वांगीण विकासासाठी मदतीचे स्त्रोत उभे करायला हवे.ते त्यांच्या पर्यंत पोचवायला हवे.त्यांना माणूस म्हणून जगायला मदत करायला हवी.हे होताना सध्या दिसत नाही.दोन पाच हजाराचं कर्ज माफ करण्याचे ऐवजी १२,१४ हजार कोटी रुपये एका माणसाचे,धन दांडग्यांचे कर्ज माफ करतो!!! ही खिरापतच नाही का?

आम्ही मात्र रुबाबाने सांगत असतो.आमचा महाराष्ट्र पुरोगामी आहे. आता ते राहिलंच नाही. आम्ही जेव्हा दूरदर्शन पाहत असतो,तेव्हा विकासाचा एक शब्द बोलला जात नाही.व्यक्ती द्वेष,भ्रष्टाचार, सी बी आय, इडी,खून,बलात्कार, द्वेष आणि कोट्यांशी संपत्ती मिळवलेल्या बातम्यांचा चंगळवाद ऐकायला मिळतो.या पलीकडे एकही संदेश लोकांच्या पर्यंत चांगला जाईल अशी एकही बातमी का दिसत नाही? विचार करण्याची वेळ आजच आलेली आहे. स्वतःला,समाजाला, राष्ट्रहिताला सावरण्याची गरज आहे.शिव शाहू फुले आंबेडकरांच्या तुकारामाच्या विचाराचा वारसा आम्हाला लाभला आहे.तो वारसा आपल्या कृतीतून मलिन तर होत नाही ना? हा प्रश्न आता माझ्यासमोर पडतो आहे. भाषणात मात्र शिव शाहू फुले आंबेडकरांचे नाव घेऊन भाषणाला सुरुवात होते.आणि जगण्याची रीत मात्र देशाला खपवण्याची असते.असं कसं चालेल? ज्या देशात न्याय हा समान असतो.त्या देशाची प्रगती होते. हा इतिहास आपण मोडखळीस तर आणत नाही ना?आता याची शंका यायला लागली नाही तर ते सिद्धही झालं आहे.

हे सर्व घडत असताना याला कारणीभूत कोण आहे? असा जर सवाल समोर आला तर त्याला पहिल्यांदा उत्तर असेल मी, आम्ही.जर मी आणि आम्ही असे उत्तर असेल तर होणाऱ्या चुकांना बदलायची जबाबदारी मी आणि आम्ही वर येऊ शकते.तेव्हा पुरोगामी महाराष्ट्रच ठेवायचा असेल, तो व्यक्तीपर्यंत सकारात्मक दृष्ट्या पोहोचवायचा असेल,तर मी आणि आम्ही पासून बदलाची प्रक्रिया सुरू करावी लागेल. दुर्बलांच्या विकासाला प्राधान्य द्यावे लागेल.शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमी भाव द्यावा लागेल.निसर्गाचं संरक्षण आणि संवर्धन करावं लागेल.पाण्याचं जतन करावं लागेल. उत्पादनाची साधने वाढवावी लागतील. भ्रष्टाचाराने गाठलेला उच्चांक त्याचं मर्दन करावे लागेल.आणि भारतीय संविधान हा धर्म म्हणून प्रत्येक नियम कायद्याचं पालन करावे लागेल.सोबत अशा खिरापती वाटणे आता बंद करावं लागेल. याचा विचार मी आणि आम्ही पासूनच करायला हवा.

**चला तर नवीन युगाची सुरुवात आपल्यापासून करू...**

पान १ वरुन

## 'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'

मार्गावर तसेच पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' या उपक्रमांतर्गत १५ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी आणि औषधोपचारात्मक आरोग्य सेवा पुरवून राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने विक्रमी कामगिरी बजावली आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री मा. प्रा. डॉ. तानाजी सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली देहु-आळंदी ते पंढरपूर व इतर जिल्ह्यातील पालखी मार्गावर आणि पंढरपूर येथे वारकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी दि. १४ ते १८ जुलै २०२४ या कालावधीत वाखरी, गोपाळपुर , तीन रस्ता, ६५ एकर पंढरपूर येथे महाआरोग्य शिबिराचे आयोजन करून आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना आणि भाविकांना विविध आरोग्य विषयक सेवा पुरविण्यात आल्या.

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्र्वर महाराज, जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या पालखीसह राज्यातील विविध जिल्ह्यांतून पंढरपूरला निघालेल्या संतांच्या पालख्या आणि दिंड्यांमध्ये सहभागी झालेल्या लाखो वारकऱ्यांना रस्त्यात काही त्रास जाणवला की लगेच उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य विभागाने सलग दुसऱ्या वर्षी 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' हा उपक्रम राबविला. या उपक्रमांतर्गत प्रत्येक पाच किलोमीटर अंतरावर एक आपला दवाखाना तयार करून वारकऱ्यांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. पालखी मार्गावर मोठी गर्दी असल्याने मोठी प्रत्येक ठिकाणी ॲम्बुलन्स फिरू शकत नाही. त्यामुळे फिरती बाईक ॲम्बुलन्स सज्ज ठेवण्यात आली होती. याशिवाय १०२ व १०८ या ॲम्बुलन्सनेही पालखी मार्गावर सेवा दिली. पालखीमध्ये दिंडी प्रमुखांना आरोग्य कीट देण्यात आली होती. याबरोबरच महिलांसाठी प्रत्येक ठिकाणी हिरकणी कक्षाची सोय करण्यात आली आहे. डॉक्टर, नर्स, आरोग्य सहाय्यक, आशा, आरोग्य सेवक, शिपाई, सफाईगार अशा सर्व कर्मचाऱ्यांनी वारीमध्ये सेवा दिली. 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' माध्यमातून पालखी मार्गावर आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. वारकरी आणि भाविकांमध्ये आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने उपक्रम राबविण्यात आले. यात आरोग्य दिंडी, चित्ररथ, आरोग्य दूत, संदेश टोपी, आरोग्य प्रदर्शनी, बॅनर्स/ स्टिकर्स, आरोग्य संदेश ऑडिओ व्हिडिओ, समाज माध्यमे, आकाशवाणी व दूरदर्शनद्वारे संदेश प्रसारण, वृत्तपत्र जाहिरात, क्यूआर कोडचे वाटप, आरोग्य ज्ञानेश्र्वरी यांचा समावेश आहे

**पंढरपूर येथील महाआरोग्य शिबिरांमध्ये पुरविण्यात आलेली आरोग्य सेवा –** ✻ पंढरपूरमध्ये वाखरी, ३ रस्ता, गोपाळपूर, ६५ एकर या विविध ठिकाणी दि. १४ ते १८ जुलै २०२४ या कालावधीत महाआरोग्य शिबिरे (२४✻७).✻ पंढरपूरमधील ६५ एकर व गोपाळपूर येथे हॉस्पिटल सेटअप उभारण्यात आला. ✻ याशिवाय, शहरात विविध ठिकाणी ६ अतिदक्षता विभाग व १४ तात्पुरते 'आपला दवाखाना' कार्यान्वित .✻ पंढरपूर ग्रामीण भागामध्ये विविध २६ ठिकाणी अतिदक्षता विभाग व तात्पुरते 'आपला दवाखाना' कार्यान्वित. ✻एकूण १२१ आरोग्य दुतांमार्फत आरोग्य सेवा.✻ वाखरी व ३ रस्ता येथील शिबिरामध्ये आभा स्कॅन आणि शेअर याअंतर्गत एकूण १,७२४ नोंदणी. ✻महाआरोग्य शिबिरामध्ये विषयतज्ज्ञ, एमबीबीएस व पॅरामेडिकल स्टाफ आणि इतर अधिकारी/कर्मचारी यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत २,७१२ व भैरवनाथ शुगर्स व जयवंत शिक्षण प्रसारक मंडळ (गड्झच्) स्वयंसेवक १,००० असे एकूण ३,७१२ मनुष्यबळामार्फत मोफत आरोग्य सेवा.

– महाशिबिराद्वारे नेत्रविकार, हृदयरोग, किडनी, पोटाचे विकार, त्वचेचे विकार, मधुमेह, उच्च रक्तदाब, त्वचारोग, दंतरोग, संसर्गजन्य रोग (क्षयरोग, कुष्ठरोग), कॅन्सर यांसारख्या रोगावर मोफत उपचार.✻ ज्या वारकऱ्यांना शस्त्रक्रिया व सुपरस्पेशालिटी सेवेची आवश्यकता भासेल, त्यांची स्वतंत्रपणे यादी करून, सर्वांची मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

**पंढरीच्या वारीदरम्यान विविध माध्यमांद्वारे आरोग्य विभागाची जनजागृती** आषाढी वारीनिमित्त दरवर्षी आरोग्य विभागामार्फत वारकऱ्यांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवण्यासाठी प्रयत्न केले जातात. या वर्षीही 'आरोग्याची वारी, पंढरीच्या दारी' माध्यमातून पालखी मार्गावर आरोग्य विभागातर्फे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक, आरोग्य संदर्भ सेवा देण्यात आली. आरोग्य शिक्षण व जनजागृती करण्यासाठी विभागामार्फत नावीन्यपूर्ण व कल्पक पद्धतीने उपक्रम राबविण्यात आले.


## राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते

हस्ते कोनशिलेचे अनावरण, फीत कापून विहाराचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी राष्ट्रपती श्रीमती मुर्मू यांनी विहारातील गौतम बुद्ध यांच्या मूर्तीस तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बुद्ध वंदना झाली. वंदनेनंतर उपस्थित बौद्ध भिक्कूंना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी चिवर दान केले. बौद्ध भिक्कू यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना गौतम बुद्धांची मूर्ती भेट दिली. क्रीडा मंत्री श्री. बनसोडे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**विहाराची वैशिष्ट्ये** उदगीर येथील विहार कर्नाटक येथील कलबुर्गीच्या बुद्ध विहाराची प्रतिकृती आहे. एक हेक्टर १५ आर एवढ्या जागेवर या विहाराची उभारणी करण्यात आली आहे. विहारात १२०० अनुयायांची बैठक व्यवस्था असलेले ध्यान केंद्र तयार करण्यात आले आहे. विहार परिसरात प्रवेश करण्यासाठी एक मुख्य प्रवेशद्वार तयार करण्यात आले असून या प्रवेशद्वाराची रचना बिहारमधील सांची स्तूपाप्रमाणे करण्यात आली आहे.

## अनिल सावंत मित्रमंडळा कडून

सामाजिक कार्याची माहिती देणाऱ्या पन्नास हजार परिचय पुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहे शिवसेनेचे जिल्हा संघटक संजय बनपट्टे युवा सेनेचे जिल्हाप्रमुख बालाजी बागल, पंढरपूर शहर प्रमुख विश्र्वजीत भोसले, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष स्वागत दादा कदम , जाधव गुरु ठिगळे, कृष्णदेव लोंढे, बंडू जाधव तानाजी चव्हाण देवकर गुरुजी सुभाष साळुंखे गणेश घोडके, अमोल आटकळे, श्याम भाऊ सर, आधीच्या माध्यमातून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सोलापूर महानगरपालिकेतील भ्रष्टाचार व जिल्ह्याच्या विकासासाठी सोलापूर विकास मंचकडून पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांना सोलापूर विकास मंचने विविध मागण्यांसाठी निवेदन सादर केले आहे. या निवेदनात सोलापूर महानगरपालिकेतील भ्रष्टाचार, जिल्ह्यातील पर्यटन विकास, पाणीपुरवठा, आणि नागरी विमानसेवा यांसारख्या मुद्द्यांचा समावेश करण्यात आला आहे.



**महानगरपालिकेतील भ्रष्टाचारावर तातडीने कारवाईची मागणी** सोलापूर महानगरपालिकेच्या बांधकाम परवाना विभागात खोटे आणि बोगस परवाने दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या भ्रष्टाचारामुळे शेकडो कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे समोर आले आहे. सोलापूर विकास मंचने या बाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी केली असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल करण्यात यावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

**पंढरपूर पर्यटन विकासासाठी मंजूर निधीबद्दल आभार** सोलापूर जिल्ह्याच्या आध्यात्मिक आणि धार्मिक पर्यटन विकासासाठी महाराष्ट्र सरकारने पंढरपूरसाठी ११० कोटी रुपये आणि जिल्ह्यातील एकात्मिक पर्यटन आराखड्यासाठी २८२ कोटी रुपये निधी मंजूर केला आहे. सोलापूर विकास मंचने या निधीबद्दल सरकारचे आभार मानले आहेत.

**छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल रस्त्यासाठी निधी मंजुरीची मागणी** सोलापूरातील छत्रपती संभाजी महाराज चौक ते सीएनएस हॉस्पिटल ते राजस्व नगर ५४ मीटर रस्त्याच्या कामासाठी उझऊ किंवा केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांतर्गत निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मागणी सोलापूर विकास मंचने केली आहे.

**डॉल्बी आणि लेझरबाबत न्यायालयीन नियमांचे पालन सुनिश्चित करण्याची विनंती** सोलापूर शहरात मिरवणुका आणि सण-उत्सवांमध्ये डॉल्बी आणि लेझरच्या वापरावर न्यायालयीन आदेशांचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सोलापूर पोलीस आयुक्तालय आणि सोलापूर महानगरपालिकेस द्यावेत, अशी मागणी मंचने केली आहे.

**होटगी रोड विमानतळावर नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत** सोलापूरातील होटगी रोड विमानतळावरील सर्व नागरी कामे पूर्ण झालेली असून, नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी ऊ्रछ- कडून तातडीने पावले उचलावीत, अशी विनंती सोलापूर विकास मंचने केली आहे.

**जिल्ह्यातील प्रमुख मंदिर परिसर भिक्षेकरी मुक्त करण्याची मागणी** सोलापूर शहरातील श्री सिद्धरामेश्र्वर मंदिर, पंढरपूरातील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर, आणि जिल्ह्यातील अन्य प्रमुख मंदिर परिसर भिक्षेकरी मुक्त करण्याची मागणी मंचने केली आहे. भिक्षेकऱ्यांचे पुनर्वसन करणे, तसेच मंदिर परिसरात अन्नदानाला रोख लावणे, यासाठी सामाजिक संस्था आणि व्यक्तींना प्रोत्साहन देण्यात यावे, असे त्यांनी म्हटले आहे.

**झोपडपट्टी मुक्त सोलापूरसाठी पुनर्वसन योजना राबविण्याची विनंती**सोलापूर शहरातील झोपडपट्टीवासीयांची दयनीय अवस्था लक्षात घेता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाद्वारे विविध प्रकल्प राबवून सोलापूर शहर झोपडपट्टी मुक्त करण्याची विनंती मंचने केली आहे.

**सोलापूरातील विस्कळीत आणि गढूळ पाणीपुरवठा सुधारण्याची मागणी** सोलापूर शहरात पाणीपुरवठा विभागाच्या अनियमिततेमुळे सोलापूरकरांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. सण-उत्सवांच्या काळात नागरिकांना स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा सुनिश्र्चित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी

मंचने केली आहे. सोलापूर विकास मंचने या सर्व मागण्यांवर तातडीने कारवाई होईल, अशी आशा व्यक्त केली आहे. ह्यावेळी सोलापूर विकास मंचचे मिलिंद भोसले, योगिन गुर्जर, केतन शहा, विजय कुंदन जाधव, ॲड.दत्तात्रय अंबुरे, गणेश शिलेदार, प्रशांत भोसले आदी मान्यवर सदस्य उपस्थित होते.



# हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते पळसदेव व तरंगवाडी तलावाचे जल पूजन!

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

इंदापूर/अतुल सोनकांबळेः राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघ नवी दिल्लीचे अध्यक्ष व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या हस्ते खडकवासला कालव्यातील पाण्याने भरून घेण्यात आलेल्या पळसदेव व तरंगवाडी (ता. इंदापूर) येथील तलावातील पाण्याचे उत्साही वातावरणामध्ये जल पूजन बुधवारी (दि.४) करण्यात आले.

पळसदेव व तरंगवाडी परिसरातील शेतकरी व नागरिकांच्या दृष्टीने हे दोन्हीं तलाव महत्त्वाचे आहेत. या तलावाच्या पाण्यावरती अनेक गावच्या नळ पाणीपुरवठा योजना अवलंबून आहेत. त्यामुळे या तलावासह इंदापूर तालुक्यातील खडकवासला कालव्यावरील सर्व तलाव भरून घेणे संदर्भात हर्षवर्धन पाटील यांनी सातत्याने आग्रही भूमिका घेतली व पाठपुरावा केला. त्यामुळे पळसदेव व तरंगवाडी तलावांमध्ये पाणीसाठा झाल्याने हर्षवर्धन पाटील यांनी आनंद व्यक्त केला. आगामी काळातही इंदापूर तालुक्यातील शेतीला पाणी कमी पडू दिले जाणार नाही, असेही हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले. या जल पुजन कार्यक्रमास पळसदेव, तरंगवाडी परिसरातील पदाधिकारी, शेतकरी, कार्यकर्ते, ग्रामस्थ व हितचिंतक उपस्थित होते. दरम्यान, हर्षवर्धन पाटील यांचे हस्ते भादलवाडी तलावातील पाण्याचे रविवारी जलपूजन करण्यात आले.

# रिपब्लिकन कार्यकर्त्यांना महायुती सरकारने सत्तेत सहभाग आणि सन्मान द्यावा : केंद्रिय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा विश्र्वास मी जिंकला आल्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळात मला स्थान मिळाले आहे.त्यामुळे देशभर रिपब्लिकन पक्ष वाढत आहे.रिपब्लिकन पक्षात दलितांसोबत सर्व जाती धर्माचे लोक मोठ्या प्रमाणात जोडले जात आहेत.ईशान्य भारतात रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढली आहे.महाराष्ट्रात संघटनात्मक बांधणी करून लोकांना जोडून पक्षाचे बळ वाढवावे लागेल त्यानंतर स्वबळाची भाषा करावी लागेल असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले.



शनमुखानंद सभागृह येथे मुंबई प्रदेश रिपब्लिकन पक्षातर्फे केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी सत्काराला उत्तर देताना ना रामदास आठवले बोलत होते यावेळी विचारमंचावर भाजप प्रवक्ते आमदार प्रवीण दरेकर ; रासप चे माजी मंत्री महादेव जानकर ; सौ सीमाताई आठवले; अध्यक्ष स्थानी रिपाइं चे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; माजी मंत्री अविनाश महातेकर; रिपाइं चे महाराष्ट्र अध्यक्ष राजा सरवदे; राज्यसरचिटणीस गौतम सोनवणे ;मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड; सूत्रसंचालन विवेक पवार यांनी केले.सुनील बन्सी मोरे; दयाळ बहादुर,सुरेश बारशिंग, श्रीकांत भालेराव आशाताई लांडगे शीलाताई गांगुर्डे;अनिल गांगुर्डे; अभाया सोनवणे; फुलाबाई सोनवणे; उषा रामलू;सौ नैनाताई वैराट; प्रकाश जाधव; रमेश गायकवाड; संजय डोळसे; संजय पवार ; अजित रणदिवे साधू कटके; सोहेल शेख , रवी गायकवाड, डी एम चव्हाण, ऋषी माळी आदी अनेक मान्यवर उपस्थित होते

माझ्यासोबत प्रामाणिक कार्यकर्त्यांची फौज आहे. वर्षोनुवर्षे त्यांना काही मिळाले नाही तरी माझ्या सोबत आहेत. राज्यात महायुती सरकार शासन आपल्या दारी आणि लाडकी बहिण योजनेचे कार्यक्रम घेते तेंव्हा रिपब्लिकन कार्यकर्त्यांना डावलले जाते.त्यांना सन्मानाने या शासकीय कार्यक्रमांना निमंत्रित केले जात नाही. रिपब्लिकन पक्ष हा महायुती चा प्रमुख घटक पक्ष आहे.त्यामुळे महायुती सरकारने रिपब्लिकन कार्यकर्त्यांना जिल्हा नियोजन समिती जिल्हा तालुका कमिटी राज्यस्तरीय महामंडळांवर सत्तेत सहभाग द्यावा आणि सन्मान द्यावा अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केली.

यावेळी आमदार प्रवीण दरेकर यांनी ना.रामदास आठवले यांच्यावर कविता सादर करून देशात सर्वात मोठे दलितांचे आंबेडकरी जनतेचे नेते रामदास आठवले हेच एकमेव असल्याचे गौरवोद्गार काढले.त्यांचा आदर्श घेऊन रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आपल्या भागात काम करावे म्हणजे रिपब्लिकन पक्षाची ताकद वाढेल आणि सत्तेचा वाटा उमेदवारी मागायची वेळ येणार नाहीतर मित्रपक्ष स्वतःहून रिपब्लिकन कार्यकर्त्यांना उमेदवारी देण्यास तयार होईल असे मत आमदार प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केले.रिपब्लिकन पक्षाची ताकद प्रचंड आहे.मात्र निवडणुकीत ताकद दाखवली पाहिजे

.रिपब्लिकन डावी लोकशाही आघाडी मधून रिपब्लिकन पक्ष १११ जागांवर लढला मात्र रिपब्लिकन पक्षाचा एक ही उमेदवार निवडून आला नाही हे लक्षात ठेवा .स्वबळाची भाषा करताना रिडालोस चा अनुभव लक्षात ठेवा असे संगुन रिपब्लिकन ची ताकद आहे ताकद वाढावा आणि डिमांडर होऊ नका कमांडर व्हा असा सल्ला माजी मंत्री महादेव जानकर यांनी रिपब्लिकन कार्यकर्त्यांना दिला.

# प्राध्यापक मंगल एल.सिंह यांची जिल्हा अध्यक्षपदी निवड

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

मुंबई/विजय घनघावः केंद्रीय मंत्री रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या आदेशानुसार, रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेच्या उत्तर पश्र्चिम जिल्हाध्यक्षपदी रिपाइं मुंबई संघटन सचिव प्राध्यापक मंगल एल सिंह यांची निवड करण्यात आली आहे. तसे पत्र महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर कांबळे यांनी त्यांना दिले. या वेळी रिपब्लिकन बहुजन विद्यार्थी परिषदेचे मुंबई अध्यक्ष सचिन बनसोड, कार्याध्यक्ष ॲड. संदीप केदारे, रिपाइंचे मालाड तालुका अध्यक्ष सुनील गमरे, मुंबई उपाध्यक्ष विकास गायकवाड, कायदेशीर सल्लागार ॲड. कपिल झोडगे, इशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष



धम्मदीप बनसोडे, ॲड. प्रशांत बिळासकर यांनी प्रा. मंगल सिंह यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालय आणि समाज कल्याण मागासवर्गीय आणि इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत तसेच शिष्यवृत्ती आणि शुल्क माफीमध्ये विद्यार्थ्यांना या विद्यार्थी संघटनेकडून न्याय देण्याची काम केले जाते. ही संघटना २५ वर्षांपासून विद्यार्थ्यांसाठी काम करते.

# कायदा व सुव्यवस्थेचे पालन करून गणेश उत्सव साजरा करा : तानाजी बरडे

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पुरंदर /प्रतिनिधी :सासवड शहर मधील गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष तसेच सासवड पोलीस स्टेशनच्या अंतर्गत येणारी गावे मंडळाचे अध्यक्ष व दक्षता कमिटी पोलीस पाटील व पत्रकार यांची सासवड पोलीस स्टेशनच्या वतीने बैठक घेण्यात आली, या बैठकीमध्ये कायद्याच्या चौकटीत राहुन गणेश उत्सव साजरा करा असे आव्हान मा.तानाजी बरडे साहेब - उपविभागीय पोलीस अधिकारी भोर विभाग यांनी केले. तसेच आकर्षक देखावे,पारंपरिक वाद्याच्या गजरात मिरवणूक, व शांतता प्रिय गणेश मंडळांना पोलीस स्टेशनच्या वतीने सन्मान चिन्ह देऊन त्यांचा सन्मान करण्यात येईल,सासवड शहरांमधील तीन गणपती मंडळे,तसेच सासवड पोलीस स्टेशन अंतर्गत येणारी गावे त्यातील तीन मंडळे, यांचा गौरव करण्यात येईल असेही त्यावेळी मा बरडे साहेबांनी सांगितले.



यावेळी सासवड पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक- ऋषिकेश अधिकारी,सासवड नगरपालिकेचे मुख्याधिकारी -कैलास चव्हाण,सहाय्यक पोलीस निरीक्षक -वैभव सोनवणे ,सासवड नगरपालिकेचे आरोग्य अधिकारी -श्री मोहन चव्हाण या सर्वांनी गणेशोत्सव मंडळांना काही महत्त्वाच्या सूचना व मार्गदर्शन केले महावितरण चे श्री कामठे साहेब यांनीही वीज कनेक्शन संदर्भात येणाऱ्या अडचणी मिरवणुकीमध्ये येणाऱ्या अडचणी याबद्दल सूचना केल्या व त्यावर मार्ग काढण्याचे आव्हान केले. पत्रकार हेमंत ताकवले,संभाजी महामुनी व पोलीस पाटील विनायक गायकवाड यांनीही यावेळी आपल्या सूचना मांडल्या यावर मा तानाजी बरडे साहेब यांनी आलेल्या सूचनावर मार्गदर्शन करून त्यावर तोडगा काढला जाईल असे सांगितले,सासवड शहर मधील गणेश मंडळाचे अध्यक्ष सासवड पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांचे पोलीस पाटील बंधू-भगिनी पत्रकार- गणेश मुळीक, अमृत भांडवलकर,बापू मुळीक, फोटोग्राफर जगदीश शिंदे,दक्षता कमिटीचे सदस्य,यावेळी उपस्थित होते सदर मीटिंग चे नियोजन सासवड पोलीस स्टेशनचे गोपनीय रुपेश भगत यांनी केले.शेवटी श्री वैभव सोनवणे -सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी आलेल्या सर्व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले व येणारा गणेश उत्सव शांततेत पार पडावा व पोलीस प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन केले.

# स्टार प्रवाहवर सुरु होतेय नवी मालिका आई आणि बाबा रिटायर होत आहेत!

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

२०० आठवडे सातत्याने आघाडीवर रहात स्टार प्रवाह वाहिनीने संपूर्ण महाराष्ट्रात आपला दबदबा निर्माण केला आहे. स्टार प्रवाहच्या सर्वच मालिका लोकप्रियतेच्या शिखरावर आहेत. प्रेक्षकांच्या अभिरुचीचा अभ्यास करुन त्यांना आपलेसे वाटतील असे मालिकेचे विषय, घरातील सदस्य वाटावीत अशी पात्र आणि सोबतीला जाणकार अशी लेखक, दिग्दर्शक आणि तंत्रज्ञांची फौज हेच स्टार प्रवाहचं खऱ्या अर्थाने वेगळेपण. मायबाप प्रेक्षकांच्या प्रेमामुळेच आज संपूर्ण महाराष्ट्राची पहिली पसंती स्टार प्रवाह वाहिनीला आहे. हेच प्रेम द्विगुणीत करण्याच्या हेतूने स्टार प्रवाह सादर करीत आहे नवी मालिका आई आणि बाबा रिटायर होत आहेत. मालिकेचं शीर्षक ऐकताक्षणीच आपल्या डोळ्यासमोर आपले आई-बाबा नक्कीच उभे रहातात. प्रत्येकाच्या आयुष्यातली अत्यंत महत्त्वाची मात्र तितकीच गृहित धरली जाणारी ही दोन हक्काची माणसं. आयुष्यभर खस्ता खाऊन आईवडील आपल्या मुलांना लहानाचं मोठं करतात. मुलं शिकून स्वतःच्या पायावर उभी रहातात, त्यांच्या संसारात रमूनही जातात. आई-वडील मात्र घरच्या जबाबदारीतून कधीही रिटायर होत नाहीत. मुलं, त्यांचं शिक्षण, त्यांची नोकरी, त्यांचं लग्न आणि नंतर नातवंडं एकामागोमाग येणाऱ्या या जबाबदारीच्या चक्रात ते नकळतपणे अडकून जातात. आई आणि बाबा रिटायर होत आहेत ही मालिका देखिल अशयाच एका जोडप्याभोवती फिरते



ज्यांना खरतर घरच्या जबाबदाऱ्यांमधून निवृत्त तर व्हायचं आहे मात्र न संपणारं जबाबदारीचं ओझं त्यांच्यावर नकळतपणे लादलं जातं. दिग्गज कलावंत निवेदिता सराफ आणि मंगेश कदम या नव्या मालिकेतून भेटीला येणार आहेत.

स्टार प्रवाहच्या या नव्या मालिकेविषयी सांगताना स्टार प्रवाहचे बिझनेस हेड सतीश राजवाडे म्हणाले, 'आई आणि वडील हे आपले दैवत असतात आणि ही मालिका त्यांना आणि त्यांच्या निःस्वार्थपणाला अर्पण आहे. जे बोट धरून आपण चालतो, जी पावलं आपल्याला बळ देतात ती सुद्धा कधीतरी थकतील, त्यांना सुद्धा त्यांच्या जबाबदारीतून कधी तरी मुक्तता मिळायला हवी. त्यांना सुद्धा जाणीव करून देणं फार महत्वाचं असतं की आता आराम करा. मुलं, सुना, जावई, नातवंडं अशी अनेक नाती उलगडत जाणारी गोष्ट आणि आई-वडील त्यांची भूमिका कशी शेवटपर्यंत ठामपणे आणि प्रामाणिकपणे बजावतात हे अधोरेखित करणारी ही मालिका आहे. ही मालिका सर्वांच्या घरात आणि मनात स्थान मिळवेल यात शंका नाही. तेव्हा पाहायला विसरु नका नवी मालिका आई आणि बाबा रिटायर होत आहेत लवकरच फक्त स्टार प्रवाहवर.'

स्टार प्रवाह संपर्क :
सोनाली शिगवण ९९३०९२३२४८

# मैंदर्गी मुली शाळेत शाडू पासून गणपती निर्मिती प्रशिक्षण




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथे प्रदूषणमुक्त गणपती मूर्ती बनविण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले शाडूचा मूर्ती का बनवावे प्लास्टर ऑफ पॅरिस याचे मूर्ती का बनवू नये याबद्दल मुलींना मूर्तिकार विकास गोसावी सोलापूर यांनी पटवून सांगितले मूर्ती बनविण्यासाठी सोलापूर येथून शाळा माती विकत मागवले होते मूर्ती प्रशिक्षकासोबत मोठे वर्गाचे मुली सुद्धा मूर्ती बनविले बनवलेल्या मूर्तीला वाळल्यानंतर कलर करण्यासाठी मूर्ती घरी देण्यात आले आणि त्या मूर्ती मुलींना त्यांचे घरात प्रतिष्ठापन करण्यासाठी सांगण्यात आले विसर्जन करताना मैंदर्गी बनवलेल्या स्वनिर्मिती पाणीचा डब्यात विसर्जन करण्यात यावे सार्वजनिक विहिरीत करू नये असे मुलींना मार्गदर्शन करण्यात आले यावेळी नगरपालिकेचे वैशाली नना स्वच्छता निरीक्षक नगरपरिषद मैंदर्गी तसेच अविनाश केंद्रे शहर समन्वयक मैंदर्गी यांचे सहकार्याने आणि मुख्याध्यापक महांतेश्र्वर कट्टीमनी व त्यांचे सहकारी शिक्षक यांचे नियोजनामुळे शाडू गणपती बनवण्याचे कार्यशाळा व्यवस्थित पार पडले

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति पंढरपूर यांचे वतीने श्री.गणेशोत्सव संगीत महोत्सवाचे आयोजन

## पं.रघुनंदन पणशीकर.गंधार देशपांडे.नागेश आडगावकर. अवधूत गांधी.मंगेश बोरगांवकर.सार्थक शिंदे.यांची लाभणार उपस्थिती



मंगेश बोरगावकर | पं.रघुनंदन पणशीकर | नागेश आडगांवकर | गंधार देशपांडे | अवधूत गांधी | सार्थक शिंदे

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति पंढरपूर यांचे वतीने आयोजित प्रतिवर्षाप्रमाणे श्री गणेशोत्सवा निमित्ताने महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक गायिका यांच्या उपस्थितीत संगीत महोत्सव संपन्न होणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिति सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके साहेब आणि सर्व सन्माननीय सदस्य यांच्या मार्गदर्शनाखाली व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या अथक परिश्रमातून दिनांक ८ सप्टेंबर ते १६सप्टेंबर या काळात श्री संत तुकाराम भवन येथे रात्री ८:०० ते १०:०० या वेळेत संगीत महोत्सव संपन्न होणार असून रविवार ८ सप्टेंबर रोजी ख्यातनाम गायक अवधूत गांधी आळंदी यांचा लोकसंगीत आणि पोवाडा गायनाचा कार्यक्रम गुरुवार दिनांक १२ सप्टेंबर स्वप्न सुरांचे तरुणाईचे मंगेश बोरगावकर सहकलाकार लातूर यांचा कार्यक्रम शुक्रवार १३ सप्टेंबर रोजी स्टार प्रवाह उपविजेता फेम सार्थक शिंदे सहकलाकार आळंदी यांचा स्वरसार्थक कार्यक्रम शनिवार १४सप्टेंबर ख्यातनाम शास्त्रीय गायक गंधार देशपांडे मुंबई यांचा स्वरगंधार शास्त्रीय व अभंग गायन रविवार दिनांक १५सप्टेंबर रोजी नागेश आडगांवकर पुणे यांचा अभंगवाणी संतांची कार्यक्रम तर या संगीत महोत्सवाची सांगता सोमवार दिनांक १६ सप्टेंबर रोजी किशोरीताई आमोणकर यांचे शिष्य रघुनंदन पणशीकर यांच्या बोलावा विठ्ठल या कार्यक्रमाने होणार आहे.या सर्वांना भरत कामत स्वप्नील भिसे.पांडूरंग पवार.रोहन पंढरपूरकर.समर्थ उकरंडे.महेश बधे.तबला साथ तर सिध्देश बिचोळकर. अभय नलगे.श्रीहरी मेंदकर. ज्ञानप्रसाद फुलारी शुभमं खंडाळकर सोहम साने.एम आर चेतन.अभी पवार हार्मोनियम साथ तर ज्ञानेश्र्वर दुधाणे राजेंद्र बघे.पखवाज साथ तर सोमनाथ तरटे संबळ.शिवराज पंडीत.ऋषिकेश साळवे.प्रसाद भांडवलकर. टाळाची साथसंगत करणार आहेत.तरी या भरगच्च कार्यक्रमाला पंढरपूर व पंढरपूर पंचक्रोशीतील

कला रसिक श्रोते आणि कलासाधक मंडळींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहून या संगीत मेजवानीचा लाभ घ्यावा असे आवाहन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांचे वतीने करण्यात आले आहे.महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व मंदिरे समितीचे पदाधिकारी अधिकारी कर्मचारी अधिक परिश्रम घेत आहेतर

# जिल्हास्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडेल स्कूलचे यश




**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

अक्कलकोट/ प्रतिनिधीः जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सोलापूर व क्रीडा संचालनालय पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या १४ वर्षी खालील जिल्हास्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत इंडियन मॉडल स्कुलने विजेतेपद पटकाविले. १४ वर्षाखालील गटातील सामन्यात विठ्ठलराव शिंदे अंबड या संघाला २-० ने पराभव करत इंडियन मॉडेल स्कूल ने विजय संपादन केला आहे. या संघाला शाळेची क्रीडा शिक्षक दयानंद दणूरे सर क्रीडा सहशिक्षक संतोष सोनकंटले हॉकी प्रशिक्षक मुन्ना होटगी हॉकी मार्गदर्शक जरार कुरेशी सर यांचे मार्गदर्शन लाभले. विजय संघातील खेळाडू :- या संघात वेदिका चव्हाण(कर्णधार), शर्वरी मिटगिरी, झरीन करवल,कल्पना भंडारकवठे, लक्ष्मी निंगदली , श्रेया निंबाळकर, जान्हवी नवले, आलिनाझोहा जमादार, आसावरी देगावकर, कादंबरी गाडे, झिकरा जमादार, तनिष्का मोरे, बुशरा गौर, साई पाटील, सभा कुमठे, गुरुदेवी वंजारी. या यशाबद्दल शाळेचे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, संस्थेचे उपाध्यक्ष अमोल जोशी सर, सायली जोशी मॅडम, संस्थेचे सचिवा शितलताई म्हेत्रे, बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणपती वाघमोडे सर, इंडियन मॉडेल स्कूलचे मुख्याध्यापिका गौरी दातार मॅडम ,यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# सिनेमा आणि नाटक ही आव्हानात्मक क्षेत्रे ग्रामीण विद्यार्थी सहज पेलू शकतात : अभिनेते मकरंद पाध्ये



**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः कर्मवीर भाऊराव पाटील यांनी गोर, गरीब, वंचित आणि उपेक्षितांच्या मुलांसाठी ज्या उद्देशाने शाळा सुरु केली. तो उद्देश आज सफल होताना दिसत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये असतात, त्यांची संघर्षाची तयारी असते, त्यांच्यामध्ये सुप्त कलागुण असतात, विद्यार्थ्यांनी न्यूनगंड न बाळगता अभिनयाच्या क्षेत्रात उडी घेतली पाहिजे. सिनेमा आणि नाटक ही आव्हानात्मक क्षेत्रे असली तरी देखील ग्रामीण भागातील विद्यार्थी ती लीलया स्वीकारू शकतील असे प्रतिपादन धर्मवीर चित्रपटातील अभिनेते मकरंद पाध्ये यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेच्या येथील कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात रुसा काम्पोनंट आठ अंतर्गत मराठी विभाग व कामाक्षी क्रिएटिव्ह मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या नाट्य कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे हे होते. मकरंद पाध्ये पुढे म्हणाले की, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या विकासासाठी नाटक या कला प्रकारावर पाच दिवसाची कार्यशाळा घेते आहे ही अतिशय कौतुकास्पद बाब आहे. आपला विद्यार्थी घडावा. त्यांच्यात प्रात्यक्षिक स्वरुपात कौशल्ये विकसित करावीत. ही भूमिका अभिमानास्पद आहे. महानगरातील महाविद्यालयातून अशा स्वरूपाच्या कार्यशाळा घेतल्या जात नाहीत. शहरातील विद्यार्थ्यांना अशा स्वरूपाच्या संधी शोधाव्या लागतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा सदुपयोग करून घ्यावा.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. चंद्रकांत खिलारे म्हणाले की, पंढरपूर क्षेत्राला सांस्कृतिक वारसा आहे. त्यामध्ये भर घालण्याचे काम महाविद्यालय करत आहे. सध्या अतिशय वेगाने समाज जीवनात बदल घडत आहेत. त्यामुळे मुल्ये जतन करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. कलेच्या माध्यमातून समाजातील संस्कृतीची जोपासना करता येते. विद्यार्थ्यांनी कलांची जोपासना केली तर त्यांना आनंदी जीवन जगता येईल. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय राकेश तळगावकर यांनी करून दिला. या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यासाठी उमेश घळसासी, डॉ. सोमनाथ सोनवलकर, आकाश भडसावळे, निलम चव्हाण, शांताराम सावंत आदी तज्ज्ञ उपस्थित होते. या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. तुकाराम अनंतकवळस, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. उज्ज्वला शिंदे, डॉ. बापूसाहेब घोडके, डॉ. सुमित साळुंखे व सहभागी विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले. शेवटी उपस्थितांचे आभार प्रा. डॉ. दत्ता डांगे यांनी मानले.

# आ.बबनदादा शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रम संपन्न

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : आज कमला भवानी ग्लोबल कॉर्प लिमिटेड पांडे येथे माढा तालुक्याचे भाग्यविधाते आमदार बबनरावजी (दादा) शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर, वृक्षारोपण, शाळेला शैक्षणिक साहित्याची वाटप अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कमला भवानी सहकारी साखर कारखान्याची चेअरमन विक्रम सिंह शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते कमला भवानी ब्लड बँक करमाळा व कमलाभवानी ग्लोबल कॉर्प लिमिटेड पांडे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिधारायची आयोजन करण्यात आले होते त्यावेळी कारखान्याचे कर्मचारी शेतकरी, ऊस उत्पादक यांचा उत्स्फूर्तपणे सहभाग दिसून आला होता या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संजय मामा शिंदे मोठा वाहतूक संस्थेचे अध्यक्ष सुजित सुजित तात्या बागल, बोरगावचे सरपंच विनय ननवरे, अर्जुन नगरचे युवा नेते समाधान भोंगे, हनुमंत बागल मांगी आधी उपस्थित होते वरील मान्यवरांच्या हस्ते सर्व कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी कारखान्याची डेप्युटी जनरल मॅनेजर शिरसागर, असिस्टंट जनरल मॅनेजर पाटील, मुख्य शेती अधिकारी जगदाळे, पचासकीय अधिकारी राम हरी जगताप, शेती अधिकारी पाटील सिविल विभागाचे प्रमुख टोणपे, परचेस विभाग प्रमुख सय्यद, सुरक्षा अधिकारी धनके ऊस पुरवठा अधिकारी सुजय शिंदे, बनकर चीफ केमिस्ट्री जाधव, वित्त विभागाची संजय पाटील, त्याचबरोबर माढेश्र्वरी अर्बन बँकेचे सर्व कर्मचारी यांनी यामध्ये सहभाग नोंदवला यामध्ये एकूण ८१ लोकांनी आपले रक्तदान केले कारखान्याची प्रशासकीय अधिकारी जगताप यांनी सर्वांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली

# डॉक्टर निकम टू लिप्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री आयुष्यमान जन आरोग्य योजना यांचे उद्घाटन

**दैनिक यशसिद्धी न्युज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधीः डॉक्टर निकम यांचे ट्यूलिप सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल यांच्या वतीने आतापर्यंत अस्तिरोग व एक्सीडेंट या रुग्णावर उपचार केले जात होते पण या मागील काळात गावोगावी मोफत अस्थिरोग शिबिराचे आयोजन केले जात होते परंतु आता डॉक्टर निकम यांची ट्युलिप सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल डी मार्ट रोड पंढरपूर येथे गेल्या वर्षापासून रुग्ण सेवेत उतरले आहे या हॉस्पिटलमध्ये सर्व प्रकारच्या म्हणजेच न्यूरोलॉजिस्ट जनरल मेडिसिन कार्डिओलॉजिस्ट न्यूरोलॉजी हाडाची आजार प्लॅस्टिक सर्जरी छातीचे आजार कानामध्ये आजार व त्वचेचे आजार अपघात फॅशन थेरपी आम सी यु इन्शुरन्स असणाऱ्या पेटीएम साठी कॅलिसिस सुविधा विषबाधा जॉईंट रिप्लेसमेंट एक्स-रे अत्याधुनिक सिटीस्कॅन डिपार्टमेंट आधुनिक २४ तास मेडिकल सुविधा यावरती उपचार केले जातात परंतु आता हे सर्व उपचार महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत केले जातात आहे




या लाभार्थी असतील त्यांना या योजनेचा लाभ घ्यावा या उद्घाटन प्रसंगी पंढरपूर मंगळा मतदार संघाचे आमदार समाधान दादा अवताडे यांनी हॉस्पिटलच्या शुभेच्छा दिल्या याप्रसंगी बोलताना डॉक्टर प्रशांत निकम यांनी उपस्थित रोगांच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत लाभ देण्याची आव्हान केली या उद्घाटनाच्या निमित्त हॉस्पिटलमध्ये आज मोफत सर्व रोग निदान शिबिराच्या आयोजन केले होते यामध्ये १५० रुग्णाची तपासणी करण्यात आली मोफत बीएमडी तपासणी सीबीसी तपासणी शुगर तपासणी अशा अनेक तपासण्या ५०% सवलत देण्यात आली शिबिरातील पेटंटला ऑपरेशनची गरज वाचल्यास ती गरज महात्मा फुले जन आरोग्य योजनेतून किंवा हॉस्पिटलच्या सवलतीच्या दरात करणार असल्याचेही सांगितले या प्रसंगी मा पसंद नाना देशमुख मा अमरजी पाटील महा सुभाष भोसले महाभारत कोळेकर मा उज्वल भालेराव मा शहाजी साळुंखे विलास भोसले किरण घाडगे मा दीपक वाढदिवर दिनकर कदम मा दिलीप चव्हाण मा दिनकर चव्हाण मा संतोष कांबळे बाळासाहेब माळी विनोद लटके भागवत बहिरट शाही मोहिते एकनाथ बोधले दादासाहेब देशमुख राजू पाटील इत्यादी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सोनालीका कंपनीच्या जुन जॅकपॉट लकी ड्रॉ सोडत समृद्धी ट्रॅक्टर्स पंढरपूर येथे संपन्न

पंढरपूर/प्रतिनिधीः समृद्धी ट्रॅक्टर पंढरपूर येथे सोनालीका ट्रॅक्टर कंपनीच्या जुन जॅकपॉट लकी ड्रॉची सोडत दिनांक २ऑगस्ट रोजी ऑनलाईन पद्धतीने संपन्न झाली. या जुन जॅकपॉट लकी ड्रॉ मध्ये जुन महिन्यामध्ये ट्रॅक्टर खरेदी केलेल्या ग्राहकांनसाठी लकी ड्रॉ घेण्यात आला होता. यामध्ये प्रथम बक्षीस 65HP CRDS 4WD ट्रॅक्टर, द्वितीय बक्षीस टाटा पंच कार, तृतीय बक्षीस रॉयल एनफील्ड बुलेट, चौथे बक्षीस होडा शाईन गाडी, पाचवे बक्षीस LED TV, सहावे बक्षीस मोबाइल फोन आणि सातवे बक्षीस रिस्ट वॉच ही लकी ड्रॉ ची सोडत ऑनलाईन पद्धतीने घेण्यात आली.यामध्ये समृद्धी ट्रॅक्टर्स, पंढरपूर येथील ग्राहक बिराप्पा माळी रा. मंगळवेढा हे रॉयल एनफील्ड बुलेटचे विजेते ठरले आहेत. त्याच बरोबर कृष्णा पडळकर रा. कासेगाव हे होंडा शाईन गाडीचे विजेते ठरले आहेत आणि श्रीमंत बिराजदार, रा. चिकलगी हे मोबाइल फोनचे विजेते ठरले, त्याच बरोबर तुकाराम सावंत रा. जवळा हे रिस्ट वॉचचे विजेते ठरले.




या सर्वांचे धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक मर पाटील यांनी अभिनंदन केले. या येणार्या सणासुदी निमित्त हेवी ड्यूटी धमाका या नवीन लकी ड्रॉ स्कीमची घोषणा करण्यात आली. ही स्कीम दि. १५ ऑगस्ट ते ८ नोव्हेंबर २०२४ रोजी ट्रॅक्टर खरेदी करणार्या ग्राहकांसाठी देण्यात आली. यामध्ये प्रथम बक्षीस 65HP CRDS 4WD ट्रॅक्टर, द्वितीय बक्षीस टाटा पंच कार, तृतीय बक्षीस २५सा सोन्याचे नाणे, चौथे बक्षीस रॉयल एनफील्ड बुलेट, पाचवे बक्षीस रोटावेटर, सहावे बक्षीस होंडा शाईन गाडी, सातवे बक्षीस वाशिंग मशीन, आठवे बक्षीस LED TV, नऊवे बक्षीस मोबाईल फोन, दहावे बक्षीस ज्यूसर मिक्सर आणि अकरावे बक्षीस रिस्ट वॉच असे एकूण ११,०११ भेटवस्तु जिंकण्याची सुवर्ण संधी. याचा जास्तीत जास्त शेतकर्यांनी फायदा घ्यावा असे आवाहन धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील यांनी पंढरपूर - मंगळवेढा - सांगोला येथील सर्व शेतकर्यांना केले.

यावेळी धाराशिव साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक अमर पाटील, श्री. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे संचालक तुकाराम मस्के, सोनालिका कंपनीचे टेरिटरी मॅनेजर ओंकार कोळी, समृद्धी ट्रॅक्टरचे मॅनेजर सोमनाथ केसकर, सर्व शेतकरी बांधव व समृद्धी ट्रॅक्टर चे सर्व स्टाफ उपस्थिती होता.